**ठळक बातम्या**

- दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी नेमलेल्या सर्वपक्षीय प्रतिनिधी मंडळांचे दौरे जाहीर

- ऑपरेशन सिंदूरच्या सन्मानार्थ राज्यात विविध ठिकाणी तिरंगा यात्रांचं आयोजन

- कृषि क्षेत्रातल्या विविध संस्था मधे योग्य समन्वय झाल्यास कृषिक्षेत्रात चमत्कार होऊ शकतो, असं केंद्रीय कृषीमंत्र्यांचं प्रतिपादन

- नवनियुक्त पोप लिओ चौदावे यांचा शपथविधी

**आणि**

- हैद्राबादच्या चारमिनार परिसरातल्या गुलजार हाऊसला लागलेल्या आगीत किमान ८ जणांचा मृत्यू

**<><><><><>**

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत, सात सर्वपक्षीय प्रतिनिधिमंडळं लवकरच वेगवेगळ्या देशांना भेट देणार आहेत. या संदर्भात, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी या शिष्टमंडळांचं नेतृत्व करणाऱ्या खासदारांची आणि सदस्यांची यादी जाहीर केली आहे. त्यानुसार, शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालचा गट युएई, लायबेरिया, काँगो आणि सिएरा लिओनला भेट देईल. राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालचा गट इजिप्त, कतार, इथिओपिया आणि दक्षिण आफ्रिकेला भेट देईल. रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखाली यूके, फ्रान्स, जर्मनी, युरोपियन युनियन, इटली आणि डेन्मार्कला भेट देणाऱ्या गटात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रियंका चतुर्वेदी यांचा समावेश आहे. काँग्रेसचे

शशी थरूर यांच्या नेतृत्वाखालचा गट अमेरिका, पनामा, गयाना, ब्राझील आणि कोलंबियाला भेट देणार असून त्यात शिवसेनेचे मिलिंद देवरा यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशभरात तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत. नागपूर जिल्ह्यात सावनेर इथं निघालेल्या तिरंगा यात्रेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहभागी झाले होते. आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया अंतर्गत निर्मित शस्त्रास्त्रांमुळं पाकिस्तान विरुद्धच्या युद्धात आपण विजयश्री प्राप्त केली. या शस्त्रास्त्रांसाठी जगातून भारताकडे मागणी होत आहे, असं फडणवीस यांनी वार्ताहरांशी संवाद साधताना सांगितलं....

**होल्ड - बाईट- फडणवीस**

नागपुरात भाजपचे प्रदेशाध्यक्ष आणि राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात सिंदूर सन्मान तिरंगा यात्रा काढण्यात आली. यात्रेत ५०० फूट लांबीचा तिरंगा ठेवण्यात आलेला होता. ही भाजपची राजकीय यात्रा नाही, सर्वजण भारतीय सैन्यासोबत आहेत भारतीय सैन्याच्या समर्थनार्थ आणि दहशतवादाविरुद्ध देशाची एकता दाखवण्यासाठी, ही भव्य तिरंगा यात्रा आयोजित केली असल्याचं यावेळी बावनकुळे म्हणाले.

मुंबईत कांदिवली इथं आमदार अतुल भातखळकर यांच्या नेतृत्वात तिरंगा यात्रा निघाली. अनेक सेवानिवृत्त सेना अधिकारी, सैनिक यात सहभागी झाले होते. त्यांचा सत्कार करुन यात्रेचा समारोप करण्यात आला.

छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात आज सकाळी फुलंब्री येथे तिरंगा यात्रा काढण्यात आली. नागरिक मोठ्या संख्येने तिरंगा यात्रेत सहभागी झाले होते.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात देवगड शहरातून आज तिरंगा यात्रा काढण्यात आली. भारत माता की जय, सामर्थ्य भारताचे, भारतीय सैनिकांचा विजय असो, वंदे मातरम् अशा राष्ट्रभक्तिपर घोषणांनी संपूर्ण देवगड परिसर रविवारी दणाणून गेला.

जालना शहरातून निघालेल्या तिरंगा यात्रेत माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, यांच्यासाह माजी सैनिक आणि नागरिकांनी मोठ्या संख्यने सहभाग घेतला.

सांगली जिल्ह्यात शिराळा इथं आज तिरंगा यात्रा आयोजित करण्यात आली होती.

**<><><><><>**

आज आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिवस आहे. त्या निमित्ताने पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या अखत्यारीतली देशातली सर्व स्मारकं आणि संग्रहालयांमध्ये आज मोफत प्रवेश मिळेल, असं केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयानं जाहीर केलं आहे. देशाचा सांस्कृतिक वारसा जतन करण्यामध्ये, तसंच शिक्षण आणि संवादाला प्रोत्साहन देण्यात संग्रहालयांची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करणं, हे आजच्या दिवसाचं उद्दिष्ट आहे.

**<><><><><>**

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून शेतकरी हा तिचा आत्मा आहे. त्यामुळेच विकसित भारत घडवायचा असेल तर विकसित शेती आणि समृद्ध शेतकरी यावर आपल्याला भर द्यावा लागेल, असं प्रतिपादन केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केलं. नागपूर इथे विकसित कृषी या विषयावरच्या उच्चस्तरीय बैठकीवेळी ते बोलत होते. नागपूर जिल्ह्याच्या प्रमुख कृषी विषयक आणि ग्राम विकास योजनांचा आढावा घेण्यासाठी ते आज राज्याच्या दौऱ्यावर आहेत.

विकसित, गरिबीमुक्त गाव हे आपल्या सरकारचं लक्ष्य असून त्यासाठी योग्य ती पावलं उचलली जात आहेत. कृषि क्षेत्रातल्या विविध संस्था स्वतंत्रपणे कार्य करत असून जर या संस्थांचा आपापसात समन्वय साधला आणि त्यांना योग्य दिशा

दिली, तर कृषिक्षेत्रात चमत्कार होऊ शकतो. त्यामुळे आता एक देश, एक राज्य, एक कृषी आणि एक पथक अशा योजनेची आपण घोषणा करत असल्याचंही चौहान यावेळी म्हणाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात कृषी क्षेत्रासाठी नवोन्मेषी योगदान देणाऱ्या प्रगतिशील शेतकऱ्यांचा गौरव करण्यात आला. तसंच त्यांनी 'नॅशनल सॉईल स्पेक्ट्रल लायब्ररीचं' उद्घाटन केलं.

<><><><>

प्राथमिक कृषी पत पुरवठा संस्थेच्या पुनरुज्जीवनासाठी नवीन धोरण जाहीर करण्याचा विचार केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी आज व्यक्त केला. अहमदाबाद इथं  गुजरात राज्य सहकारी संघटनेने  आयोजित केलेल्या सहकार परिषदेला ते आज संबोधित करत होते.   प्राथमिक कृषी पत पुरवठा संस्थांना पुनरुज्जीवित करून सहकार क्षेत्रातल्या पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं शहा म्हणाले. २०२९ पर्यंत देशातल्या प्रत्येक ग्राम पंचायतीत प्राथमिक कृषी पत पुरवठा संस्था स्थापन करण्यात येईल, असंही त्यांनी सांगितलं. या कार्यक्रमात देशभरातल्या ८०० सहकारी संस्थांचे मिळून  ४ हजार प्रतिनिधी सहभागी झाले होते.

<><><><>

व्हॅटिकन सिटीमधल्या सेंट पीटर चौकात आज नवे पोप लिओ चौदावे यांचा शपथविधी सोहळा संपन्न झाला. यावेळी कार्डिनल डॉमिनिक माम्बर्टी यांनी पोप लिओ चौदावे यांना विधिवत पॅलियम अर्पण केला आणि ते चर्चचे प्रमुख असल्याची औपचारिकता पूर्ण केली.  त्याआधी पोप लिओ यांनी सेंट पीटर स्क्वेअरला प्रदक्षिणा घालून जनसमुदायाला अभिवादन केलं. यावेळी पदग्रहण सोहळ्यासाठी जमलेल्या हजारो ख्रिस्ती भाविकांनी त्यांचं स्वागत केलं.

या ऐतिहासिक सोहळ्यात अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जेडी व्हान्स, परराष्ट्र सचिव मार्को रुबिओ, युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की तसंच कॅनडा आणि ऑस्ट्रेलियाच्या प्रधानमंत्र्यांसह जगभरातले अनेक प्रमुख नेते आणि धर्मगुरू सहभागी झाले.

यावेळी पोप लिओ यांनी पहिला धर्मोपदेशही दिला. आपण ख्रिस्ती धर्माच्या समृद्ध वारशाचे जतन करू आणि त्याचबरोबर जगातले प्रश्न, चिंता आणि आव्हानांचा सामना करण्याच्यादृष्टीनं भविष्यातली वाटचाल करू असं त्यांनी सांगितलं. सर्वांनी एका कुटुंबाप्रमाणे एकजूट होण्याचं आवाहनही त्यांनी केलं.

**<><><><><>**

एक देश, एक निवडणूक धोरणांतर्गत लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळी घेतल्यामुळे देशाची लोकशाही बळकट होईल, असा विश्वास यासंदर्भातल्या संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष पी. पी. चौधरी यांनी काल व्यक्त केलं. रामनाथ कोविंद समितीच्या अहवालानुसार एक देश, एक निवडणूक राबवल्यास देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या १ पूर्णांक ६ दशांश टक्के, म्हणजे सुमारे साडेचार लाख कोटी रुपयांची बचत होईल, असंही त्यांनी मुंबईत वार्ताहरांना सांगितलं. एक देश, एक निवडणूक धोरण राबवण्याबाबत सर्व संबंधित व्यक्ती आणि नागरिकांची मतं जाणून घेण्यासाठी ही समिती सध्या देशव्यापी दौऱ्यावर आहे. याचा एक भाग म्हणून मुंबईत काल या समितीनं विविध बैठका घेतल्या. या धोरणाचा विविध क्षेत्रांवर काय परिणाम होईल, याबाबत विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, रिझर्व्ह बँक, नाबार्डसारख्या संस्थांचे प्रतिनिधी इत्यादींकडून या समितीनं अहवाल मागवले असून त्यांचा सखोल अभ्यास करूनच यासंदर्भात निर्णय घेणार असल्याचंही चौधरी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था - इसरोने आज ईओएस - झिरो नाईन या पृथ्वी निरीक्षण उपग्रहाचं प्रक्षेपण केलं, मात्र उड्डाणाच्या तिसऱ्या टप्प्यात तांत्रिक बिघाडामुळे ही मोहिम अयशस्वी झाल्याचं, इसरोचे अध्यक्ष व्ही नारायणन यांनी सांगितलं.

**<><><><><>**

हैद्राबादच्या चारमिनार परिसरातल्या गुलजार हाऊसला आज सकाळी लागलेल्या आगीत किमान ८ जणांचा मृत्यू झाल्याचं वृत्त आहे. मदतकार्य चालू असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे . तीन लहान मुलांसह १६ जणांना सुखरुप बाहेर काढलं आहे.  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं असून जखमी झालेल्यांना लोकर बरं वाटावं अशी कामना केली आहे. प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी २ लाख रुपये तर जखमी झालेल्यांना प्रत्येकी ५० हजार रुपये अर्थसहाय्य जाहीर झालं आहे.

**//<><><><><>//**